# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०६/२०२५ (बुधवार)**

---

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू,विदेशी दारू बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ११ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद एकुण १९,५४०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २४/०६/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन जलालखेडा ,नरखेड, देवलापार, पारशिवणी, कळमेश्वर, सावनेर,खापरखेडा अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू,मोहाफुल दारू,मोहाफुल सडवा, विदेशी असा एकुण १९,५४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा** अंतर्गत सुधीर मोतीरामजी फाटे, वय ३८ वर्षे, रा. दावसा ता. नरखेड याचेवर, **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी नामे राजकुमार रामदास तायडे, वय २७ वर्षे, रा. तिनखेडा ता. नरखेड याचेवर ,**पोलीस स्टेशन बेला** येथे विलास शंकर जोगे, वय ४८ वर्ष, रा. सावंगी, बु. ता उमरेड, जि नागपुर, याचेवर, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे १. मुलचंद तुमडाम, रा. नवेगाव चिचदा, ता. रामटेक, जि. नागपुर आणि २. भैयालाल चौकीलाल गोंडगे, वय ५५ वर्ष, रा. खापा, ता. रामटेक जि. नागपुर या दोन आरोपीतांवर **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे १. किसना बळवंता मेश्राम, वय ४४ वर्ष रा. वार्ड क्र. ०२ नयाकूंड, ता. पारशिवनी जि. नागपुर, २. प्रज्ञाशिल मंगेश मेश्राम, वय ३८ वर्ष, रा. गरंडा तह. पारशिवनी, जिल्हा नागपूर या दोन आरोपीतांवर, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** रंजीत अजय राजपुत, वय २० वर्ष, रा. वार्ड क्र. ०२ मांडवी, ता. कळमेश्वर याचेवर, **पोलीस स्टेशन खापरखेडा** येथे शैलेंद्र दौलत खडसे, वय ५२ वर्षे, रा. दहेगाव रंगारी वार्ड नं. ०३ ता. सावनेर याचेवर आणि **पोलीस स्टेशन सावनेर** येथे दोन महीला

आरोपीतांवर अशा **एकुण ११ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ११ गुन्हे दाखल केले आहे.**

## नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत विदयार्थ्यांना करण्यात आले समुपदेशन

दिनांक २४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीतील सनराईज हायस्कुल आणि जुनियर कॉलेज येथे एमआयडीसी बोरी पोलीसांनी नशामुक्त भारत अभियानाअंतर्गत कार्यक्रम घेवुन विदयार्थ्यांचे समुपदेशन केले. शाळा, महाविदयालयातील विदयार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या वाईट व्यसनाच्या अहारी जावु नये. तसेच तरूण/तरूणींमध्ये वाईट व्यसनाचे प्रमाण कमी व्हावे या दृष्टीने सदर कार्यक्रम घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रमामध्ये पोलीस निरीक्षक, श्री सतिशसिंग राजपुत,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांनी उपस्थित शाळेच्या विदयार्थ्यांना जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिवस निमित्ताने जनजागृतीपर मार्गदर्शन केले.






## <u>प्राणांतिक अपघात</u>

पोस्टे सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा येथे २४/०६/२०२५ चे ६.०० वाजेच्या दरम्यान यातील फिर्यादी नामे दिलीप रामरावजी भगत, वय ४५ वर्ष, रा. ब्रम्हपुरी ता. सावनेर, **आणि मृतक नामे— ज्ञानेश्वर गंगाधर पाणपते, वय ४५ वर्ष रा. ब्रम्हपुरी ता. सावनेर,** हे दोघेही धापेवाडा बाजार करणेकामी आदासा चौक येथे पॅशन मोटर सायकल क्र एम.एच ४० बी ९५०५ नी गेले असताना सावनेर कडुन कळमेश्वरकडे येणारा कंटेनर ट्रक क्र एच. आर. ५५ ए. एफ. ६७७० चे चालकाने फिर्यादीचे मोटर सायकल ला मागुन धडक मारल्याने फिर्यादी आणि मृतक दोघेही रोडचे बाजुला पडल्याने अपघातात मुतक

ज्ञानेश्वर गंगाधर पाणपते यांच्या डोक्याला जबर मार लागला. त्यांना मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता त्यांना वैदयकीय अधिकारी यांनी मृत घोषीत केले.

**सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे सावनेर येथे आरोपी कंटेनर ट्रक क्र एच. आर. ५५ ए. एफ. ६७७० चा चालक आरोपी नामे जितुराम सुंदरलाल याचे विरूध्द कलम २८१, १०६(१) भान्यासं सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## प्राणांतिक अपघात

**क्रमांक १)** पोस्टे बोरी अंतर्गत हायवे क्रमांक ४४ वर चंद्रपूर ते नागपूर रोड, रोहित स्टील कंपनी जवळ दिनांक २४/०६/२०२५ रोजीचे १९.०० ते १९.३० वाजेच्या **मृतक मोरेश्वर हरीभाऊ तिजारे, वय ५० वर्षे, रा. जुनी वस्ती बुटीबोरी** हे आपल्या मोटार सायकल क्रंमाक एम.एच. ४० टी. ८४४४ ने बुटिबोरी कडे येत असतांना त्यांच्या मागुन येणाऱ्या **टोयोटा फॉंरच्युनर कार क्र. सि.जी ०७ सि.टी. १५१५** चालक आरोपीने आपल्या ताब्यातील कार ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोरेश्वर तिजारे यांचे मोटार सायकल ला मागुन जोरदार धडक मारली त्यामुळे त्यांना जबर मार लागला. आरोपी चालक आपली कार ही रोडचे मधोमध सोडुन तेथुन पळुन गेला. मोरेश्वर तिजारे यांना माया हॉंस्पीटल, बुटीबोरी येथे नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला.

**सदर प्रकरणी आरोपी टोयोटा फॉंरच्युनर कार क्र. सि.जी ०७ सि.टी. १५१५ चा चालकाचे विरूध्द २८१,१०६(१) भान्यासं सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

**क्रमांक २)** पोस्टे बोरी अंतर्गत मौजा वाकेश्वर गावाजवळ २४/०६/२०२५ रोजीचे १८.०० ते १८.३० वाजेच्या दरम्यान यातील **मृतक ज्ञानेश्वर श्यामराव पांगूळ, वय ६५ वर्षे, रा. वाकेश्वर, ता. जि. नागपूर** हे आपल्या सायकलने आपल्या शेतातुन घरी परत जात असतांना ट्रक क. एम.एच ३१ एम. ४४०९ चा चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकाचे सायकल ला कट मारल्याने अपघात होवुन ते गंभीर जखमी झाले. त्यांना स्वामी विवेकानंद हॉंस्पीटल, खापरी येथे नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी आरोपी ट्रक क. एम.एच ३१ एम. ४४०९ चा चालकाचे विरूध्द कलम २८१,१०६(१) भान्यासं सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने